नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १८६ Issue - 186 | वार शनिवार दि. २३ नोव्हेंबर २०२४ Blow- Saturday Date 23 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# निकालाची उत्कंठा शिगेला, आज मतमोजणी

## मविआ, महायुतीमध्ये काटे की टक्कर; अपक्ष ठरणार किंगमेकर?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: विधानसभा निवडणुकीचा निकाल उद्या जाहीर होईल. गेल्या पाच वर्षांत राज्यात घडलेल्या अभूतपूर्व घडामोडी पाहता यंदा मतदारराजा कोणाला कौल देणार याबद्दल उत्सुकता आहे. निकालाला अवघे काही तास राहिलेले आहेत. बहुतांश एक्झिट पोल्सनी राज्यात महायुतीचंच सरकार कायम राहील असा कौल दिला आहे. पण तरीही महायुती बहुमतापासून दूर राहिल्यास भाजपनं प्लान बी रेडी केला आहे. अपक्ष आणि बंडखोरांवर लक्ष ठेवण्याची जबाबदारी भाजपच्या राज्य नेतृत्त्वानं सहा नेत्यांवर दिली आहे. विशेष म्हणजे यातल्या निम्म्या नेत्यांनी एकनाथ शिंदेंच्या बंडात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

महायुती आणि महाविकास आघाडीत तीन प्रमुख पक्ष असल्यानं यंदा इच्छुकांचा आकडा मोठा होता. त्यामुळे अनेक ठिकाणी बंडखोरी झाली. काही ठिकाणी बंडखोरांमुळे अधिकृत उमेदवार पराभूत होण्याची शक्यता आहेत. काही बंडखोर तगडे असल्यानं विशिष्टपूर्ण परिस्थितीत त्यांच्या विजयाची शक्यता वाढलेली आहे. अशा बंडखोरांवर आणि विजयाची शक्यता अधिक असलेल्या अपक्षांसाठी भाजपनं मोठी फिल्डींग लावली आहे.

विजयाची शक्यता अधिक असलेल्या अपक्ष आणि बंडखोरांशी संपर्क ठेवण्याची जबाबदारी भाजपच्या नेत्यांवर आहे. मंत्री रविंद्र चव्हाण, विधान परिषदेतील गटनेते प्रविण दरेकर, आमदार संजय कुटे, नितेश राणे, निरंजन डावखरे, मोहित कंबोज यांना अपक्ष, बंडखोरांवर करडी नजर ठेवण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. हे सगळेच नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू आणि निकटवर्तीय मानले जातात. त्यामुळे सरकार स्थापनेसाठी फडणवीस जोरदार फिल्डींग लावताना दिसत आहेत.

बंडखोर, अपक्षांवर करडी नजर ठेवण्यासाठी निवडण्यात आलेल्या सहा नेत्यांपैकी तिघांनी अडीच वर्षांपूर्वी एकनाथ शिंदेंच्या बंडात महत्त्वाची भूमिका बजावली होती. विधान परिषदेची निवडणूक झाल्यानंतर शिंदेंसह अनेक आमदार सूरतच्या दिशेनं रवाना झाले. ते सूरतमध्ये असताना आमदार संजय कुटे, रविंद्र चव्हाण, मोहित कंबोज यांनी त्यांची भेट घेत यशस्वी बोलणी केली होती. आता याच नेत्यांकडे भाजपनं पुन्हा एकदा सत्तेसाठी जुळवाजुळव करण्याची जबाबदारी दिली आहे.

# आणीबाणी काळात संसदेने जे केले ते निरर्थक ठरविणे अशक्य; सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



दिल्ली : १९७६ च्या घटना दुरुस्तीने राज्यघटनेच्या प्रस्तावनेत 'समाजवादी', 'धर्मनिरपेक्ष' आणि 'अखंडता'सारखे शब्द समाविष्ट करण्यात आले आहेत. आणीबाणीच्या काळात संसदेने जे काही केले ते निरर्थक ठरविण्यासंदर्भात काही सांगता येत नाही, असे मत सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान नोंदविले. माजी राज्यसभा खासदार सुब्रह्मण्यम स्वामी, वकील विष्णू शंकर जैन आणि इतरांनी घटनेच्या प्रस्तावनेत समाजवादी, धर्मनिरपेक्ष शब्दाचा समावेश करण्याच्या निर्णयाला आव्हान दिले आहेत. या याचिकेवरील सुनावणी सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठात शुक्रवारी झाली. या याचिकेवर २५ नोव्हेंबर रोजी रआदेश सुनावणार असल्याचे खंडपीठाने स्पष्ट केले.


संबंधित दुरुस्ती (४२वी दुरुस्ती)चा या न्यायालयानद्वारे अनेक वेळा आढावा घेण्यात आला असल्याचे सरन्यायाधीशांनी नमूद केले. १९७६ मध्ये इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वातील सरकारद्वारे करण्यात आलेल्या ४२ व्या घटनादुरुस्तीत घटनेतील प्रस्तावनेत समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि अखंडता या शब्दांचा समवेश करण्यात आला होता. दुरुस्तीद्वारे, प्रस्तावनेतील भारताचे वर्णन 'सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक'वरून 'सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक' असे बदलण्यात आले. २५ जून १९७५ ते २१ मार्च १९७७ या काळात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी भारतात आणीबाणी जाहीर केली होती. २५ नोव्हेंबर रोजी या मुद्द्यावर आपला आदेश सुनावणार असल्याचे खंडपीठाने स्पष्ट केले.

### घटनेत धर्मनिरपेक्ष, समाजवादी शब्द प्रकरणी याचिका

भारतातील समाजवाद समजून घेण्याची पद्धत इतर देशांपेक्षा खूप वेगळी आहे. आपल्या संदर्भात समाजवादाचा अर्थ प्रामुख्याने कल्याणकारी राज्य असा होतो. यामुळे खासगी क्षेत्राची चांगलीच भरभराट होत असलेले उद्योग कधीच थांबले नाहीत. याचा फायदा आम्हा सर्वांना झाला आहे. समाजवाद हा शब्द जगभरात वेगवेगळ्या संदर्भात वापरला जातो आणि भारतात याचा अर्थ राज्य कल्याणाभिमुख आहे आणि त्यांनी लोकांच्या कल्याणासाठी उभे राहिले पाहिजे आणि संधींची समानता प्रदान केली पाहिजे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हंटले आहे.

सुनावणीदरम्यान, खंडपीठाने याचिकाकर्त्यांच्या विनंतीनुसार प्रकरण मोठ्या खंडपीठाकडे पाठविण्यास नकार दिला आणि 'समाजवादी असणे' हे भारतीय अर्थाने 'कल्याणकारी (पान २ वर...)

# छत्तीसगडमध्ये १० नक्षलवादी ठार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सुकमा : छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यात सुरक्षा दलांबरोबर झालेल्या चकमकीत दहा नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी ही माहिती दिली. मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी सुरक्षा दलांच्या कामगिरीचे कौतुक केले असून, बस्तर भागात शांतता आणि प्रगतीचा काळ पुन्हा आल्याची प्रतिक्रिया दिली आहे. या भागात सुकमा जिल्ह्याचाही समावेश आहे. भेज्जी पोलीस स्थानकाच्या हद्दीत शुक्रवारी सकाळी चकमकीला सुरुवात झाली. सुरक्षा दलाचे संयुक्त पथक नक्षलवादविरोधी मोहिमेत सहभागी झाले. पोलीस महानिरीक्षक सुंदरराज पी. यांनी ही माहिती दिली. माओवाद्यांच्या कोंता आणि किस्ताराम क्षेत्र समितीचे सदस्य जंगलात असल्याची माहिती मिळाल्यानंतर मोहिमेला सुरुवात करण्यात आली.

बस्तरमध्ये विकास, शांतता आणि नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य आहे. या ठिकाणी विकास, शांतता आणि प्रगतीचे वातावरण पुन्हा आले आहे, असे मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी सांगितले.

# हिंसेशी मोदी, शहांचा संबंध नाही! कॅनडाचे स्पष्टीकरण, वृत्त काल्पनिक आणि खोटे असल्याचे निवेदन प्रसिद्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



ओटावा : कॅनडामधील शीख फुटीरतावादी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्या प्रकरणासह कॅनडामधील गुन्हेगारी जगताशी पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांचे नाव जोडण्याचे वृत्त चुकीचे आणि काल्पनिक असल्याचे कॅनडाने म्हटले आहे.

कॅनडाच्या पंतप्रधानांच्या राष्ट्रीय सुरक्षा आणि गुप्तवार्ता सल्लागार नथाली ड्रौइन यांनी या वृत्ताचे खंडन केले. राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित एका वरिष्ठ अधिकाऱ्याचा दाखला देऊन 'द ग्लोब अँड मेल' वृत्तपत्राने संबंधित वृत्त प्रसिद्ध झाले होते. या अधिकाऱ्याचे नाव वृत्तात दिले नव्हते.

या वृत्तानुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निज्जर हत्येसह इतर कटांची माहिती होती, असे कॅनडातील सुरक्षा यंत्रणांना खात्रीने वाटत होते. कॅनडा आणि अमेरिकेच्या गुप्तचर खात्याने या हत्याकटात अमित शहा आणि डोवाल, जयशंकर यांचेही नाव घेतले. या वृत्तावर आक्षेप घेऊन भारताने तीव्र शब्दांत खंडन केले.

'रॉयल कॅनडिअन माउंटेड पोलीस' (आरसीएमपी) आयुक्त माइक दुहेमे यांनी १४ ऑक्टोबर रोजी कॅनडामध्ये पसरत चाललेल्या हिंसेला (पान २ वर...)

# जाहीर माफी मागा, अन्यथा; राहुल गांधी, खरगेंविरोधात विनोद तावडे आक्रमक

### विनोद तावडे यांनी तीन काँग्रेस नेत्यांना पाठवली कायदेशीर नोटीस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विरारच्या विवांता हॉटेल मध्ये भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे पैसे वाटप करत असल्याचा आरोप बहुजन विकास आघाडीने केला होता. या आरोपानंतर विरोधकांनी विनोद तावडे आणि भाजपावर सडकून टीका केली होती. विधानसभा निवडणूक मतदानाच्या काही तास आधीच हा प्रकार झाल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली. या प्रकारानंतर राजकीय आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडल्याचे देखील पाहायला मिळाले होते. दरम्यान विनोद तावडे आणि भाजपाच्या नेत्यांनी विरोधकांचे आरोप फेटाळून लावले. मात्र विनोद तावडे यांनी आता मतदारांना पैसे वाटल्याचे आरोप करणाऱ्या काँग्रेसच्या नेत्यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे. तावडे यांनी माध्यमांशी बोलताना यासंबंधी माहिती दिली आहे.

काँग्रेस नेत्यानी माझी आणि माझ्या पक्षाची बदनामी करण्यासाठी जाणिवपूर्वीक अशी विधाने केल्याचे तावडे म्हणाले आहेत. विनोद तावडे म्हणाले की, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पूर्वसंध्येला, १९ नोव्हेंबर रोजी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेस नेते राहुल गांधी आणि पक्षाच्या प्रवक्त्या सुप्रिया यांनी विनोद तावडे हे ५ कोटी रुपये मतदारांना वाटताना रंगेहात सापडले अशी विधाने केली. त्यांना या नाटकी विधानांनी त्यांना मला आणि माझ्या पक्षाला बदनाम करायचे होते. (पान २ वर....)

## महाराष्ट्र विधानसभा निवडणूक मतदान प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण

## पोलिसांचा मतमोजणी परिसरात चोख बंदोबस्त



# राज्यातील प्रशासकीय यंत्रणा मतमोजणीसाठी सज्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विधानसभा निवडणूक -२०२४ मध्ये मतदानाचे प्रमाण वाढले असून, सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीतील ६१.१% वरुन यावेळी अंदाजे ६६% पर्यंत मतदानाचे प्रमाण पोहोचले आहे. (पोस्टल मतांचा समावेश वगळता). मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या नेतृत्वाखालील भारत निवडणूक आयोगाने नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या प्रक्रियांचे सखोल विश्लेषण करण्यात आलेले आहे. यानुसार अनेक उपक्रम राबविण्यात आले, ज्यांची काटेकोर अंमलबजावणी राज्यात २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदानाच्या दिवशी दिसून आली.

मतदार यादी पारदर्शक आणि अद्ययावत करण्यासाठी ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यांत दुसरी विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरिक्षण मोहीम राबविण्यात आली होती. लोकसभा निवडणुकीनंतर मतदार यादी सतत अद्ययावत करत असताना या पुनरिक्षणामुळे ४० लाख नवीन मतदारांची भर पडली, ज्यामध्ये १८-१९ वयोगटातील मतदारांचे प्रमाण ५०% पेक्षा जास्त होते. तृतीयपंथीय, विशेषत: असुरक्षित आदिवासी जमाती समूह (झतढद्यै) आणि दिव्यांग मतदारांना मतदार यादीत समाविष्ट करण्यावर विशेष लक्ष दिले गेले.

मतदारांना सुविधा मिळाव्यात यासाठी मतदान केंद्रांवर विशेष भर देण्यात आला. मतदान केंद्रांचे पुनर्रचना, गटातील केंद्रीकरण कमी करणे, तात्पुरत्या ठिकाणांवरून कायमस्वरूपी इमारतींमध्ये मतदान केंद्र हलविणे, गरजेनुसार नवीन मतदान केंद्र स्थापन करणे, तसेच उंच इमारतींमध्ये, गृहसंकुलांमध्ये आणि झोपडपट्टीत मतदान केंद्र उभारणे यासारखे उपक्रम राबविण्यात आले.

मतदान केंद्रातील मतदारांची संख्या मर्यादित ठेवण्याच्या उद्देशाने मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण करुन नवीन मतदान केंद्र निर्माण करण्यात आली. ५८०० हून अधिक ठिकाणी गटातील केंद्रीकरण कमी करण्यात आले; ११०० हून अधिक मतदान केंद्र उंच इमारती आणि गृहसंकुलांमध्ये उभारण्यात आली; तर २०० हून अधिक मतदान केंद्र झोपडपट्ट्यांमध्ये स्थापन करण्यात आली.

प्रत्येक मतदाराला आपले मतदान केंद्र ओळखणे सोपे जावे यासाठी 'आपले मतदान केंद्र जाणून घ्या' मोहिम राबविण्यात आली. तसेच, जवळजवळ सर्व मतदारांना मतदार माहिती चिठ्ठ्या वितरित करण्यात आल्या. मुंबईत, एकाच ठिकाणी अनेक मतदान केंद्र असल्यास त्यांना वेगळ्या रंगाच्या कोड देण्यात आला, आणि हा रंग कोड मतदार माहिती चिठ्ठीतही छापण्यात आले, ज्यामुळे मतदारांना आपले मतदान केंद्र आेळखणे सुलभ झाले.

प्रत्येक मतदान केंद्रावर किमान आश्वासित सुविधा जसे पिण्याचे पाणी, रॅम्प, रांगेत बसण्याची सोय, पार्किंग सुविधा आदींवर निवडणूक आयोगाने विशेष लक्ष दिले. ग्रामीण व शहरी स्थानिक संस्थांनी या सुविधा पुरविण्यात यश मिळवले, ज्याचे सर्व मतदारांनी राज्यभर कौतुक केले.

मतदारांसोबत योग्य वर्तन ठेवण्यासाठी मतदान अधिकाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले. लोकसभा निवडणुकीत एका वेळी एका व्यक्तीला मतदान केंद्रात सोडण्याच्या नियमाऐवजी, या वेळी एकाच वेळी चार व्यक्तींना प्रवेश देण्यात आला. मतदार ओळख, शाई लावणे आणि मतदान हे तीनही टप्पे एकाच वेळी विविध मतदारांकरिता पूर्ण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक (छडड) व एन.सी.सी. कॅडेट्सनी (छउउ) रांगा व वाहतूक व्यवस्थापनात मदत केली, तसेच वयोवृद्ध आणि दिव्यांग व्यक्तींनाही सहाय्य केले.



मुंबई ही राज्याचे राजधानी शहर असल्याने, तसेच जागतिक स्तरावर मोठे व महत्त्वाचे शहरी केंद्र असल्याने, लोकसभा निवडणुकीत दिसलेल्या काही आव्हानांचा अभ्यास करून आणि सध्याच्या प्रशासकीय परिस्थितीचा सखोल आढावा घेतल्यानंतर, निवडणूक आयोगाने मुंबई शहर व उपनगर या दोन्ही जिल्ह्यांसाठी मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांना जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्त करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. याशिवाय, अतिरिक्त महापालिका आयुक्तांना सहायक जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून नेमण्यात आले आणि प्रत्येक अधिकाऱ्याला एका संसदीय मतदारसंघाची (सहा विधानसभा मतदारसंघ) जबाबदारी देण्यात आली. उपक्रम यशस्वी झाला व त्याचा फायदाही लगेच दिसून आलेला आहे.

आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्यासाठी महसूल, पोलीस आणि इतर निवडणुकीशी संबंधित विभागातील महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या. कायदा आणि सुव्यवस्थेशी संबंधित आव्हाने हाताळताना क्षेत्रीय यंत्रणा नेहमीच सतर्क राहिली.

मतमोजणी व्यवस्था

२८८ विधानसभा मतदारसंघांसाठी २८८ मतमोजणी केंद्रे आणि १६-नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी ०१ मतमोजणी केंद्र स्थापन करण्यात आले आहे. २८८ विधानसभा मतदारसंघांसाठी २८८ मतमोजणी निरीक्षक (पान २ वर...)

## संपादकीय....

# सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी

१९७६ च्या घटना दुरुस्तीने राज्यघटनेच्या प्रस्तावनेत 'समाजवादी', 'धर्मनिरपेक्ष' आणि 'अखंडता'सारखे शब्द समाविष्ट करण्यात आले आहेत. आणीबाणीच्या काळात संसदेने जे काही केले ते निरर्थक ठरविण्यासंदर्भात काही सांगता येत नाही, असे मत सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान नोंदविले. माजी राज्यसभा खासदार सुब्रह्मण्यम स्वामी, वकील विष्णू शंकर जैन आणि इतरांनी घटनेच्या प्रस्तावनेत समाजवादी, धर्मनिरपेक्ष शब्दाचा समावेश करण्याच्या निर्णयाला आव्हान दिले आहेत. या याचिकेवरील सुनावणी सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या खंडपीठात शुक्रवारी झाली. या याचिकेवर २५ नोव्हेंबर रोजी य्आदेश सुनावणार असल्याचे खंडपीठाने स्पष्ट केले. संबंधित दुरुस्ती (४२वी दुरुस्ती)चा या न्यायालयानद्वारे अनेक वेळा आढावा घेण्यात आला असल्याचे सरन्यायाधीशांनी नमूद केले. १९७६ मध्ये इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वातील सरकारद्वारे करण्यात आलेल्या ४२ व्या घटनादुरुस्तीत घटनेतील प्रस्तावनेत समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि अखंडता या शब्दांचा समवेश करण्यात आला होता. दुरुस्तीद्वारे, प्रस्तावनेतील भारताचे वर्णन 'सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक'वरून 'सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक' असे बदलण्यात आले. २५ जून १९७५ ते २१ मार्च १९७७ या काळात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी भारतात आणीबाणी जाहीर केली होती. २५ नोव्हेंबर रोजी या मुद्द्यावर आपला आदेश सुनावणार असल्याचे खंडपीठाने स्पष्ट केले. भारतातील समाजवाद समजून घेण्याची पद्धत इतर देशांपेक्षा खूप वेगळी आहे. आपल्या संदर्भात समाजवादाचा अर्थ प्रामुख्याने कल्याणकारी राज्य असा होतो. यामुळे खासगी क्षेत्राची चांगलीच भरभराट होत असलेले उद्योग कधीच थांबले नाहीत. याचा फायदा आम्हा सर्वांना झाला आहे. समाजवाद हा शब्द जगभरात वेगवेगळ्या संदर्भांत वापरला जातो आणि भारतात याचा अर्थ राज्य कल्याणाभिमुख आहे आणि त्यांनी लोकांच्या कल्याणासाठी उभे राहिले पाहिजे आणि संधींची समानता प्रदान केली पाहिजे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

# १९९४ च्या हिवाळी अधिवेशनाचा रक्तरंजित इतिहास

गोवारी समाजाला आदिवासी दर्जा मिळावा व त्यांना जातप्रमाणपत्रे मिळावीत या मागणीसाठी गोवारी बांधवांनी २३ नोव्हेंबर १९९४ रोजी महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन उपराजधानी नागपुरात सुरू असताना आदिवासीत्वाबाबत येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्यात या मागणीसाठी विदर्भातून आदिवासी गोवारी जमातीचे लोक लेकरांबाळांसह फडक्यात भाकरी बांधून मोर्चाने विधान भवनावर येऊन धडकले होते. दिवसभर अनेक मंत्र्यांना विनवण्याकरूनही एकही मंत्री मोर्च्याला सामोरा आला नाही. त्यावेळी तत्कालीन राज्य शासनाच्या नेत्यांच्या हेकेखोर धोरणामुळे व पोलिसांच्या लाठीमारामुळे चेंगराचेंगरी होऊन ११४ गोवारी बांधव शहीद झाले. या निराशेतून जमाव हिरमुसला. याचवेळी मोर्चातील उपस्थितांमध्ये चलबिचल सुरू झाल्याचे हेरून नेतृत्त्वहीन समाजबांधवावर पोलिसांनी अंधाधुंद लाठीमार केला. भरदिवसा काळयाकुट्ट ढगातून कडकडाडत विजा पडाव्यात तशा चारही दिशांनी कोंडी करीत शेकडो पोलिसांनी गोवारींवर लाठ्यांचा वर्षाव केला. मोगरींनी ज्वारीची कणसे कांडावी तसे कांडले. मळणीच्या खळ्यात बैलांच्या पाथेकडून कणसे तुडविली जातात तसे गोवारी तुडविल्या गेले. जीव वाचविण्यासाठी एकच धावाधाव झाली आणि न्याय मिळेल या आशेने आलेल्या गोवारींपैकी ११४ निरपराध गोवारी शहीद झाले. त्यात पुरुष, स्त्रिया, बालके यांचा समावेश होता. या शहीदांना शतशः नमन. शासनाकडून एकतर्फी झालेल्या यांच्या मरणोत्तर कार्यवाहीतून प्रकट झालेला हा शासकीय आकडा आहे. मृतांची संख्या यापेक्षा अधिक असू शकते. या व्यतिरिक्त पोलिसांच्या लाठीमारामुळे व चेंगराचेंगरीतून हे हत्याकांड घडल्याचे शासन सांगत असले तरी इतर अन्य बाबी जबाबदार असल्याची शक्यता वा ऊहापोह ना समाज नेत्यांनी केला ना हत्याकांडांच्या चौकशीसाठी नेमलेल्या दाणी आयोगाने. या दुर्दैवी हत्याकांडास शासन, पोलिस, नेता, सरकारी यंत्रणा मोर्चेकरी यापैकी कोणीही दोषी नव्हते. तर या आत्महत्या होत्या असे शासनाला दाखवायचे होते काय?

अमानुष गोवारी हत्याकांडांचा तीव्र संताप त्यावेळी महाराष्ट्रातच नव्हे तर शेजारील राज्यातूनही उमटला. तमाम जनतेने आपला राग व संताप कार्यरत सरकारे बदलवून व्यक्त केला. गरीब गोवारींप्रती आमजनतेकडून लाभलेल्या सहानुभूतीचा तो परिपाक होता. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाल्यास स्वातंत्र्यानंतर ते गोवारी कांडापर्यंतच्या



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

४० वर्षांच्या कालखंडात एकदाही सत्तेवर न आलेले भाजप-शिवसेना पक्ष प्रथमच सत्तारूढ झाले. समाजाप्रती सर्वत्र सहानुभूती आणि परिवर्तनाचे वारे वाहत असताना समाज मात्र धृवपदी अढळ नेतृत्त्वही यास अपवाद नाही. समाजाचा मुख्यप्रश्न नजरेआड करीत वैयक्तिक लाभावर नजर ठेवून राजकीय नेत्यांशी सौदेबाजी करण्यात गोवारींचे नेतृत्त्व मशगुल आहे. आणि नेतृत्त्वाने उर्मीत कां राहू नये जे नेतेपण विनाकायास रातोरात मीडियाकडून बहाल झाले होते. हत्याकांडाचा शोध आणि बोध घेत वेळीच सर्व समाज घटकांना विश्वासात घेऊन, सोबत एकत्र बसून मागणी पदरात पाडून घेण्यासाठी काहीही केले नाही. सरकारवर दबाव दडपण आणण्यासाठी संघर्षाची भूमिका घेण्याचे सोडून नेतृत्त्वाचे 'एकला चलो' तच धन्यता मानली. परिणामतः समाजाचा एकोपा निर्माण होण्याऐवजी दुभंगतच राहिला. ही समाजमन व हुतात्म्याशी कृतघ्नता ठरावी. समाजाला आदिवासीत्व बहाल करण्याची एकमेव मागणी अद्याप अडगळीत पडून आहे. त्यामुळे विकासाअभावी एक पिढी बर्बाद झाली आहे. अजून किती पिढ्यांच्या बर्बादीची वाट पाहणार आहोत की कायमच अंगावर अंधार पांघरून ११४ गोवारींचे बलिदान वाया घालविणार आहोत? याचा गांभीर्यपूर्वक विचार करण्याची वेळ आली आहे.

गोवारी जमात मुळातच नागरी संस्कृतीपासून कोसो मैल दूर असल्याने महत्त्वाकांक्षाहीन व अल्पसंतुष्ट आहे. अज्ञात दारिद्र्यात खिचपत पडलेल्या या लोकांना स्वातंत्र्यानंतरच्या ७७ वर्षांत योग्य समाजसंस्करण आणि राजकारणाशी थोडाही स्पर्श झाला नाही. अंधश्रद्धा व दारू यांच्या पाचवीला पुजलेली. संपूर्ण समाजाची आजीविका श्रमाधारित, परावलंबी असल्याने यांच्यात निर्णय शक्तीचा अभाव आहे. बरे-वाईट, फायदा-हानी कशात आहे, विकास-अविकास यातील अंतर समजून घेणे यांच्या आकलनाबाहेरची बाब आहे. वाघ-सर्पाशी भिडणारी ही जमात खरं तर हत्याकांड घडल्यानंतर अधिक संघटित व आक्रमक होणे अपेक्षित होते. पण घडतय उलटच. हत्याकांडानंतर समाजात नित्य नव्या नेत्यांचे पेव फुटले आहे. एक नेता शोधताना पन्नास मिळतील. सभेत भलेही श्रोत्यांची वाणवा राहो याची त्यांना ना पर्वा ना खंत. नेता म्हणून मिरवण्याची यांना भारी हौस असल्याने यांच्यात नेतागिरीसाठी कुतरओढ सुरू आहे. त्यामुळे समाजात एकता प्रस्थापित होण्यास आडकाठी निर्माण होते. गारुड्याने डमरू वाजविताच साप-मुंगसाची लढाई पाहण्यासाठी लहान मुले गारुड्याच्या सभोवताल गोळा होतात. तो तसा प्रचार करीत असला तरी प्रत्यक्षात साप-मुंगसाची लढाई गारुडी कधीच दाखवित नाही. परंतु भावनिक आर्जव करून बघ्यांना खिशात हात घालायला भाग पाडून पसार होतो. त्याप्रमाणे वासरात लंगडी गाय शहणी म्हणून छोटा-मोठा कार्यक्रम घेणे, राजकीय नेत्यासोबत फोटो काढून छापून आणणे व वाहवा मिळविणे असल्या चमकोगिरीतच धन्यता मानून कृतार्थ होत आहेत.

केवळ शासनाकडूनच या जमातीवर अन्याय होत असल्याचे पूर्णतः खरे नाही. यास समाज घटकही काही अंशी जबाबदार राहीले आहेत. समाजातच एकवाक्यता नसतांना सरकारला दूषणे देण्यात अर्थ नाही. वेगवेगळ्या संघटनांकडून शासनाकडे दाखल करीत असलेल्या मागणी पत्रात मोठ्या प्रमाणात तफावती आणि विसंगती असतात. त्यामुळे मागणीचे गांभीर्य आणि विश्वासार्हता संपुष्टात येते. एक संघटना 'गोंडगोवारी' या शब्दात स्वल्पविराम टाकून गोंड व गोवारी वेगळे करण्याची मागणी नोंदवितात तर दुसरी संघटना 'गोंडगोवारी' नावाची जात आहे. म्हणून 'गोवारी' ना नव्याने समाविष्ट करा म्हणून सांगते. तर तिसरी संघटना 'गोवारीं' नाच गोंडगोवारी समजून सवलती मागतात. या व्यतिरिक्त काही संघटना अनुसूचित जमातीच्या यादीत, तर काही संघटना अनुसुचित जातीच्या यादीत, तर काही इतर मागास प्रवर्गात समावेश करण्याचा तर काही संघटना इतर मागास प्रवर्गातून काढून टाकण्यासाठी आग्रह धरतात. एकाच जमातीकडून मागणी नोंदविण्याच्या अशा तीन तऱ्हा! शासनाने नेमकी कोणाची कोणती मागणी विचारार्थ घ्यावी? लोकशाहीत समाजात किती संघटना असाव्यात यावर निर्बंध नाही. समाजाची सेवा करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. याबद्दल दुमत नसावे. मुद्दा हा आहे की सर्वांनीच एकत्रित बसून तज्ज्ञांकडून समाजाचा घटनात्मक प्रश्न का हाताळला जाऊ नये? समजतात तसा हा प्रश्न साध सोपा अन् सरळ नाही. १९८५ नंतर विरोधकांनी हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा करून ठेवला आहे. तेव्हा हा प्रश्न हाताळताना प्रश्नांची उत्पत्ती व व्याप्ती, सामाजिक व अनुवंशिक शास्त्र, विविध जाती जमातींचा अभ्यास, घटना, कायदे इत्यादी बाबत सखोल जाण व अभ्यास असणे आवश्यक आहे. अन्यथा 'विंचवाचा मंत्र बाळगून नाही अन् सर्पाच्या बिळात हात घालतो' असाच हा धोकादायक प्रयत्न आहे. या मुद्यावर शासनासोबत चर्चा करीत असतांना अनेक नेते तोंडघशी पडल्याच्या घटना घडल्या आहेत.

गोवारींची मागणी योग्य आहे. पण प्रयत्नाकृतीत कमतरता व अज्ञान आहे. यावर आत्मचिंतन करावे लागेल. संघटना कितीही असल्या तरी समाजाचे हित डोळ्यासमोर ठेवून आपापसात सलोखा अन् एकवाक्यता आणावीच लागेल. यापूर्वी केलेल्या चुकांची पुनरावृत्ती टाळून एका झेंड्याखाली आत्मविश्वासने कार्यप्रवण होण्यातच भलाई आहे. यासाठी आपसातील मत्सर, श्रेय लाटण्याची चढाओढ आणि अहंकाराला तिलांजली द्यावी लागेल. बळीचा बकरा बनून मान खाली घालून होकारार्थी मान हलवून अपयशाचे धनी होऊ नका. शहिदांप्रती निव्वळ अश्रू गाळण्याच्या दिखावू पूर्ततेत धन्यता न मानता त्यांच्या राखेतून फिनिक्स पक्षाप्रमाणे उड्डाण भरा! आता रडण्याने नव्हे तर लढण्यानेच जिंकू असा निर्धार करा!! यश दूर नाही. गोवारी हत्याकांड होऊन ३० वर्षे उलटली. तरीही गोवारी बांधवांची दुर्दशा संपलेली नाही. आज आदिवासी गोवारी शहीद स्मृतीदिनानिमित्त शहीद गोवारी बांधवांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन !

# आणीबाणी काळात संसदेने जे केले ते निरर्थक ठरविणे अशक्य; सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी

(पान १ वरून..) राज्य' मानले जाते, अशी टिप्पणी केली. या वेळी सरन्यायाधीशांनी १९९४ मधील एस.आर. बोम्मई खटल्याचा दाखलादेखील दिला. घटनेतील कलम ३६८ नुसार संसदेला घटनेत दुरुस्तीचा अधिकार असून प्रस्तावनेपर्यंत विस्तारित असल्याचेदेखील नमूद केले. प्रस्तावना घटनेचे अभिन्न अंग असून ते वेगळे नसल्याची टिप्पणीदेखील न्यायालयाने केली. १९७६ मध्ये लोकसभा घटनेत दुरुस्ती करू शकत नव्हते तसेच प्रस्तावनेत दुरुस्ती करण्याचा घटनादत्त अधिकार होता ज्याचा प्रयोग केवळ संविधानसभेद्वारेच केला जाऊ शकत होता, अशी टिप्पणीदेखील खंडपीठाने केली.

समाजवाद हा शब्द जगभरात वेगवेगळ्या संदर्भांत वापरला जातो . भारतात याचा अर्थ कल्याणाभिमुख आहे. यामुळे खासगी क्षेत्राची चांगलीच भरभराट होत असलेले उद्योग कधीच थांबले नाहीत. याचा फायदा आम्हा सर्वांना झाला आहे. संधींची समानता प्रदान केली पाहिजे. असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

# राज्यातील प्रशासकीय यंत्रणा मतमोजणीसाठी सज्ज

(पान १ वरून...)

आणि १६-नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी ०२ मतमोजणी निरीक्षक नेमले गेले आहेत.

२३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता सर्व मतमोजणी केंद्रांवर मतमोजणी सुरू होईल. या प्रक्रियेदरम्यान, पोस्टल मतपत्रिकांची मतमोजणी सकाळी ८:०० वाजता सुरू होईल, त्यानंतर ईव्हीएमवरील मतांची मोजणी सकाळी ८:३० वाजता सुरू होईल.

मतमोजणी केंद्रांच्या प्रस्तावास निवडणूक आयोगाने मंजुरी दिली असून सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांनी याबाबत व्यापक प्रसिद्धी दिली आहे. निवडणूक लढविणारा उमेदवार/राजकीय पक्षांना मतमोजणी केंद्रांच्या ठिकाणाबाबत लेखी स्वरूपात कळविण्यात आले आहे. निरीक्षक व उपस्थित उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या समोर सीलबंद स्ट्राँग रूम्स उघडण्यात येतील व ईव्हीएम मतमोजणी केंद्रावर नेण्यात येतील. मतमोजणी केंद्रातील सर्व कार्यवाही सी.सी. टीव्हीद्वारे चित्रित केली जाईल. तीन- स्तरीय सुरक्षा व्यवस्था निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लागू करण्यात आली आहे.

सध्याच्या निवडणुकीत प्रक्रिया सुलभ करण्यासाठी एनआयसी (छखउ) च्या मदतीने फॉर्म १२ आणि १२-डी त्वरित हस्तांतरित करण्यासाठी ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात आली. मंजूर फॉर्मसाठी रिकाम्या पोस्टल मतपत्रिकांची देवाण-घेवाण तसेच मतदान केलेल्या मतपत्रिकांच्या विनिमयासाठी जिल्हा, विभागीय, आणि राज्य स्तरावर समन्वय केंद्रे कार्यरत करण्यात आली. ८५+ वयाच्या ६८,००० हून अधिक ज्येष्ठ नागरिक आणि १२,००० पेक्षा अधिक दिव्यांग व्यक्तींनी गृह मतदानाचा लाभ घेतला. ३६,००० हून अधिक अत्यावश्यक सेवा मतदारांनी पोस्टल मतपत्रिकांद्वारे मतदान केले आणि ४,६६,८२३ पोस्टल मतपत्रिका निवडणूक कर्मचाऱ्यांना वितरित करण्यात आल्या.

सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये टपाल मतपत्रिकांची संख्या जास्त आहे. त्यामुळे २८८ मतमोजणी केंद्रांवर १७३२ टेबल्स टपाल मतपत्रिकांच्या मतमोजणीसाठी आणि ५९२ टेबल्स इटीपीबीएमएस (एढझइचड) स्कॅनिंगसाठी (पूर्व-मोजणीसाठी) उभारण्यात आले आहेत.

मतमोजणी प्रक्रियेतील पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी सतत माध्यमांसमोर माहिती सादर करण्यात आली आहे आणि महत्त्वाचे आकडेवारी व घडामोडी ऑनलाइन व पारंपरिक माध्यमंद्वारे प्रसारित करण्यात आली आहे.

# निकालाच्या काही तास आधी राजकीय हालचालींना वेग; महायुती अन् 'मविआ'कडून 'प्रहार'शी संपर्क

मुंबई : राज्यात विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. या निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी लागणार आहे. आता निकालाला अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे या निकालाकडे अवघ्या देशाचं लक्ष लागलं आहे. महाराष्ट्रात नेमकी कोणाचं सरकार येणार? राज्यातील जनता कोणाला कौल देते? कोणता पक्ष सर्वात मोठा पक्ष ठरतो? यासह आदी प्रश्नांची उत्तरं आता २३ नोव्हेंबर रोजी मिळणार आहेत. मात्र, निकालाच्या आधीच राज्याच्या राजकारणात मोठ्या हालचाली सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. एकीकडे महायुतीच्या नेत्यांच्या बैठकांवर बैठका सुरु आहेत, तर दुसरीकडे महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या बैठकांचा धडाका सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे.



महाविकास आघाडी आणि महायुतीकडूनही सरकार स्थापनेबाबत दावे करण्यात येत आहेत. मात्र, काही एक्झिट पोलच्या अंदाजानुसार महायुती आणि महाविकास आघाडीला सत्तास्थापनेसाठी अपक्षाची मदत लागू शकते. त्यामुळे महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांकडून निकालाच्या आधीच अपक्ष निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांशी आणि छोट्या पक्षांबरोबर संपर्क सुरु असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. या पार्श्वभूमीवरच आमदार बच्चू कडू यांनी मोठं भाष्य केलं आहे. 'महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांकडून आपल्याला फोन आले आहेत', असं बच्चू कडू यांनी म्हटलं आहे. त्यामुळे निकालाच्याआधी मुंबईत पडद्यामागे नेमकी काय घडतंय? याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. आम्हालाही फोन आले आहेत. मात्र, कोणाचा फोन आला हे आत्ता सांगायला नको. महाविकास आघाडी आणि महायुतीकडून फोन आले आहेत. उद्या (२३ नोव्हेंबर ) निकालानंतर सर्व काही स्पष्ट होईल. महाविकास आघाडीकडून देखील आम्हाला फोन आला. फोन आले असले तरी आम्ही एकत्रित निर्णय घेऊ. कारण अखेर आमचे निवडणुकीतील मुद्दे महत्वाचे आहेत. आम्ही सरकार स्थापन करू. यामध्ये काही अपक्ष असतील आणि काही लहान पक्षांचा समावेश असेल, असं बच्चू कडू यांनी एबीपी माझा या वृत्तवाहीनीशी बोलताना म्हटलं.

विधानसभा निवडणुकीच्या निकालाआधी महादेव जानकर यांनीही मोठा दावा केला आहे. महादेव जानकर यांनी म्हटलं की, उद्या महाविकास आघाडीचं सरकार आलं आणि त्यांना काही जागा कमी पडल्या तर महाविकास आघाडीबरोबर आम्ही आघाडी करू आणि महाविकास आघाडीला वाटलं तर ते देखील आमचा विचार करतील. तसेच आम्ही महायुतीबरोबर जाऊ शकतो. याचं कारण म्हणजे महायुती आणि महाविकास आघाडी हे सत्तेसाठीच सारीपाठ खेळतात. मग आम्ही देखील सत्तेसाठीच पक्ष काढलेला आहे. आपल्या आमदारांनाही सत्ता मिळाली पाहिजे. छोटे पक्षच किंगमेकर ठरतील. त्यामुळे कोणालाही भीक घालण्याची गरज नाही, असं महादेव जानकर यांनी एबीपी माझा या वृत्तवाहीनीशी बोलताना म्हटलं आहे.



# ब्रेकिंग न्यूज एक्झिट पोल वर विश्वास ठेवू नका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विधानसभा निवडणुकीतील मतदारानंतर आता मतमोजणीकडे सर्वांचे लक्ष लागेलं आहे उद्या मतमोजणी होणार आहे या आधी विविध संस्थांची एकजीव फोन आले आहेत काही संस्थांनी माहिती तर काहींनी संतांनी म्हणून काय सांगायची सरकारी येईल, असा अंदाज व्यक्त केला आहे यंदा मतदानाची टक्केवारी वाढली आहे त्यामुळे वाढलेल्या मताची टक्केवारी महायुती आणि महाविकास आघाडीचा ही विश्वास दुणावला आहे

निकालाच्या पार्श्वभूमीवर शरद पवार गटाने ही तातडीने आपले सर्व उमेदवारांची ऑनलाईन मीटिंग घेतली आहे उद्या विधानसभा निवडणुकीचा निकाल आहे या आधीच पवारांनी आपल्या उमेदवाराची ऑनलाईन मीटिंग घेतली आहे, या बैठकीला पवारासह सुप्रिया सुळे व जयंत पाटील यांनीही मार्गदर्शन केले की माहिती मिळत आहे निकालापूर्वी काही महत्त्वाच्या सूचनाही देण्यासाठी या मीटिंग घेतली जी सांगितली जात आहे दरम्यान निकाल लागल्याबरोबर प्रमाणपत्र घेऊन पवारांनी त्यांच्या सर्व उमेदवारांना मुंबईला बोलवले आहे आपले आमदार सुरक्षित ठेवण्यासाठी पवार गटाने ही रणनीती आकलेची बोलले जात आहे, राज्यात महाविकास आघाडीचे सरकारी येईल,असा विश्वास पवारांनी व्यक्त केला आहे महाविकास आघाडीला १२७ जागा मिळतील अशी शक्यताही त्यांनी व्यक्त केली आहे विधानसभा निवडणूक निकालाची उत्कंठा राजकीय नेते कार्यकर्त्यांना प्रत्येक मतदारसंघातील नागरिकांनाही लागलेली आहे.

# जाहीर माफी मागा, अन्यथा; राहुल गांधी, खरगेंविरोधात विनोद तावडे आक्रमक

(पान १ वरून...) मी एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातून येतो. गेली ४० वर्षे मी राजकारणात आहे, पण मी असे काम कधीच केले नाही. पण काँग्रेसच्या नेत्यांना माझी, पक्षाची आणि माझ्या नेत्यांची बदनामी करायची होती, म्हणून ते जाणीवपूर्वक मिडिया, ट्वीटर आणि लोकांसमोर खोटे बोलले. त्यामुळे मी त्यांना कोर्टाची नोटीस पाठवली आहे. त्यांनी जाहीर माफी मागावी अन्यथा कारवाईला सामोरे जावे, असेही विनोद तावडे म्हणाले.

भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे १९ नोव्हेंबर रोजी विरारच्या विवांत हॉटेलमध्ये आले होते. भाजपाच्या या मतदारसंघातील उमेदवाराची भेट घेण्यासाठी विनोद तावडे या हॉटेलमध्ये आल्याचं सांगितलं जात होतं. मात्र, त्याचवेळी बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते क्षितिज ठाकूर यांच्यासमवेत हॉटेलमध्ये आले. या कार्यकर्त्यांकडून विनोद तावडेंकडून पैसे वाटप केल्याचा आरोप करण्यात आला. तसेच, कुणाला कसे पैसे वाटप झाले, याची माहिती असणारी डायरीही सापडल्याचा दावा करण्यात आला. यानंतर काँग्रच्या नेत्यांकडून विनोद तावडे यांच्यावर टीका करण्यात आली होती. विनोद तावडे यांनी मात्र मी निवडणुकीसंदर्भातील काही गोष्टी सांगण्यासाठी तिथे पोहोचलो होतो. त्यावेळी बविआचे कार्यकर्ते तिथे आले, त्यांचा असा गैरसमज झाला की, मी पैसे वाटतो आहे. पण याप्रकरणी आता निवडणूक आयोग आणि पोलीस तपास करत आहेत. हॉटेलमध्ये सीसीटीव्ही फुटेजही आहे. मी गेली ४० वर्ष राजकारणात आहे. जे सत्य आहे, ते समोर आहे. माझीसुद्धा मागणी आहे की याप्रकरणाची सखोल चौकशी व्हायला हवी, अशी प्रतिक्रिया दिली होती.

# हिंसेशी मोदी, शहांचा संबंध नाही! कॅनडाचे स्पष्टीकरण, वृत्त काल्पनिक आणि खोटे असल्याचे निवेदन प्रसिद्ध

(पान १ वरून...) भारतातील एजंट्स जबाबदार असल्याचा दावा केला होता. कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो यांनीही नंतर आक्षेपार्ह विधाने केली होती. कॅनडाचे उपपरराष्ट्रमंत्री डेव्हिड मॉरिसन यांनी गृहमंत्री अमित शहा यांनी कॅनडामधील शीख फुटीरतावाद्यांना लक्ष्य करण्याचे आदेश दिल्याचे वक्तव्य केले होते. कॅनडाच्या 'प्राइव्ही काउन्सिल ऑफिस'ने निवेदन प्रसिद्ध केले. त्यानुसार, '१४ ऑक्टोबर रोजी सार्वजनिक सुरक्षेला धोका असल्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा आणि इतर अधिकाऱ्यांनी कॅनडातील गुन्हेगारीबद्दल जाहीर वक्तव्ये आणि आरोप केले. भारतातील एजंट्सचा यात सहभाग असल्याचे सांगितले गेले. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार डोवाल यांच्या कॅनडामधील गुन्हेगारी जगताच्या कथित संबंधांविषयी कॅनडाच्या सरकारने काहीही निवेदन केलेले नाही किंवा तसा कुठलाही पुरावा सरकारकडे नाही. यासंबंधीचे वृत्त काल्पनिक आणि चुकीचे आहे.'

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### विनापरवाना आंदोलन केल्याप्रकरणी; अकरा जणांवर गुन्हा दाखल

सोलापूर, (प्रतिनिधी) : विनापरवाना निषेध आंदोलन केल्याप्रकरणी अकरा जणांविरुद्ध सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २१ नोव्हेंबर रोजी वॉटर फ्रंट इमारतीमधील असलेल्या शरद कोळी यांच्या बाळासाहेब ठाकरे शिवसेना कार्यालय येथे घडली. याप्रकरणी मपोशि.क्रांती भीमराव कांबळे नेमणूक सदर बझार पोलीस ठाणे यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून युवा काँग्रेस अध्यक्ष गणेश दत्तात्रय डोंगरे, शुभांगी विश्वजीत लिंगरा-ज, सुनिता महादेव इंगळे, मनीषा राहुल साठे, प्रियंका भिमण्णा लिंबोळे, भाग्यश्री संतोष जाधव, जयश्री बाबुराव खैराटे, राधा भास्कर मोरखडे, देवता गोपीनाथ धायगुडे, सुजता श्रीपती माने व मिराबाई जगन्नाथ घटकांबळे (सर्व.रा सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, वरील संशयित आर-ोपी यांनी वरील ठिकाणी पोलीस प्रशासनाकडून आंदोलन करण्यास परवानगी नसताना देखील विनापरवाना आंदोलन करत जमाबंदी आदेशाचे व आचारसंहिताचे उल्लंघन करून गैर कायद्याची मंडळी एकत्र जमवून आंदोलन करून घोषणाबाजी केली. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास मसपोनि.जगताप या करीत आहेत.

# अकलूज पोलिसांची मोठी कारवाई; पिकअप वाहना सह तब्बल २३ लाख ८६ हजाराचा गुटखा पकडला

## वाहन चालकावर गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अकलूज विमल आर एम डी पण मसाल्याच्या पन्नास वेळा व चार मोठ्या बॉक्सची वाहतूक करणाऱ्या पिकप वाहनाला पकडण्यात आखडून पोलिसांना मोठे यश आले असून वाहनाच्या चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अकलूज पोलिसांकडून मिळालेली माहिती अनुसार महिंद्र कंपनीचे पिकप महान नंबर एम एच ४५ २३ ०७ हे वाहन तपासून पहात सदर वाहनातील पोटामध्ये प्रतिबंधित गुटखा मिळून आला व यावर अन्न व औषध प्रशासन विभाग सोलापूर यांना कळवून त्यांचे उपस्थितीमध्ये सदर वाहनांची गुटकामाल तपासून पाहण्यात आला.

यामध्ये विमल पान मसाला ४५ खाकी रंगाच्या बॅगा त्यामध्ये ९३६० पाऊस तसेच त्यांचा व्ही व्हीएम तंबाखू ९३६० पाऊस विमल पान म साला मोठा झिरो पाच खाकी यामध्ये अकराशे पाऊस तसेच त्याचा दुय्यम तंबाखू अकराशे पाऊस व एमआरडी मसाला झिरो चार मोठे बॉक्स यामध्ये ९६० पुढे तसेच मिश्रण करणारे एम सेंटर तंबाखू १६० पुढे असा गुटखा तसेच महेंद्र पिकप वाहनास एकूण २३ , ८६०००/रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला आहे

सर महिंद्रा कंपनीचे पिकप वाहन एम एच ४५ ए एफ २३०७ या वाहनाचा चालक सुनील माळी चंदनशिवे वय ४३ वर्ष राहण-ार एकच रोड लिंगे वस्ती शेजारी सांगोला जिल्हा सोलापूर यांच्या विरुद्ध श्री गणेश मल्हारी लवटे वय ३७ वर्ष धंदा सरकारी नोकरी सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय अन्न व औषध प्रशासन राज्य सोल-ापूर यांच्या फिर्यादी दिल्याने आर-ोपी विरुद्ध अकलूज पोलीस आद-ेशानुसार गोरा नंबर ७ २७/२८२४ अन्न व सुरक्षा मानके कायद्यातील शिक्षा पात्र कलम (२) २६/२, (!)२६/२,()२७,(!)२७,(३,,) (९)३०(२)५९ नेमण ु सात ३२७,२७४,२७५,व,१२३ प्रमाणे सविस्तर गुन्हा दाखल करण्यात




आला आहे.

गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर,, उपविभागीय पोलीस अधिकारी नारायण शिरगावकर, सह पोलीस निरीक्षक योगेश लंगोटे, पोलीस हेड कॉन्स्टेबल बकाल पोलीस कोबल पठाण हे तपास करीत आहेत

# सत्तेवर येणाऱ्या कोणत्याही पक्षाला जनतेच्या सर्वांगीण हितासाठी जोतिबा फुले यांचे धोरण आणि लोकशाहीवादी तत्त्वज्ञान घेऊनच पुढे जावे लागेल : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल अंतर्गत ७४ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने सत्तेवर येणाऱ्या कोणत्याही पक्षाला जनतेच्या सर्वांगीण हितासाठी जोतिबा फुल्यांचे धोरण आणि लोकशाहीवादी तत्त्वज्ञान घेऊनच पुढे जावे लागेल. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर १७ नोव्हेंबर १९५१ ला म्हणाले होते. या ऐतिहासिक विधानाच्या ७३ व्या वर्धापनदिनानिमित्त १७ नोव्हेंबर २०२४ ला ७४ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी उद्घाटनपर म ार्गदर्शन करताना कल्याण येथील सामाजिक कार्यकर्ते साहेबराव इंगोले म्हणाले की, समाजातील विविध समस्यांचा विचार करून प्रत्यक्ष खड्डा बुजवायला आ-पणास सुरूवात करावी लागेल. करिता ठोस पावले उचलली पाहिजेत. कृतीशीलतेची जोड देऊन अशाप्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन मुंबई सारख्या शहरात पण केले पाहिजे.

याप्रसंगी डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, फुल्यांनी शिक्षणाला अग्रक्रम दिला असला तरी खेड्यापाड्यातील विद्या-र्थी दहावी, बारावीच्या पुढे शिकत नाहीत. ज्याम ुळे ते बेरोजगारीला बळी पडून हतबल झालेली पहायला मिळतात. सुभाष ठोकळ म्हणा-ले की, मूलभूत अधिकारान्वये राज्यकर्त्यांनी जनतेच्या सर्वांगीण हितासाठी अन्न, वस्त्र, निवारा याची व्यवस्था केली पाहिजे. समाजाप्रती अनास्था बाळगण-ारे ९९ टक्के लोक स्वतःसाठी व कुटुंबासाठी झटत असतात. पत्नी, आई, बहिण व मुलीच्या स्वरूपात मताचे मूल्य समजून घेतले पाहिजे. सम्यक राम टेके म्हणाले की, बाबासाहेब आंबेडकरांनी मनुस्मृती का जाळली? याचे मर्म समजून घेणे आवश्यक आहे. इंजिनिअर किशोर पाटील म्हणाले की, शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांना लोकमान्य ही पदवी दिली होती. याची जाणीव ठेवून तसे प्रस-ारीत केले पाहिजे. बाबासाहेब कळाल्यापासून जीवन जगण्याची दिशाच बदलली आहे. विलास कट्यारे म्हणाले की, भारताचे संविधानात आजच्या विषयाचे प्रतिबिंब पहायला मिळते. शासनकर्ती जमात बनण्यासाठी आवश्यक अटी आणि शर्थींची पूर्तता केली पाहिजे. सुभाष वानखेडे म्हणाले की, सम ाजात अनेक जण पाखंडवाद, अंधविश्वास पसरवीत असतात. ज्यामुळे पुनश्च प्रतिक्रांती होते की काय? अशी भीती निर्माण झाली आहे. त्यांनी 'भीमा तुझ्या मताचे जर पाच लोक असते तर तलवारीचे तयांच्या न्यारे टोक असते' हे गीत सादर केले. प्रतीक पंचशील म्हणाले की, फ ुल्यांचे धोरण स्विकारतांना सार्वजनिक सत्यधर्म समजून घेतला पाहिजे. भीमराज बोर्डे म्हणाले की, सत्तेच्या किल्ल्या ताब्यात घेण्यासाठी फुले शाहू आंबेडकरांचा वारसा डोक्यात घेतला पाहिजे.

प्रमुख वक्त्या प्रा. डॉ. सुकेशनी थोरात म्हणाल्या की, भाषण देणारी व्यक्ती अनेक पुस्तके वाचून मार्गदर्शन करीत असतो म्हणून भाषण ऐकायला गेलेच पाहिजे. फोडा आणि राज्य करा या नीतीला फाटा देण्यासाठी व्होट हमारा और राज तुम्हारा नहीं चलेगा या कांशीराम यांच्या तत्वांची अंमलबजावणी केली पाहिजे. शिक्षणाकडे केवळ नौकरीच्या दृष्टीने बघितल्याने बेरोजगारी वाढत आहे. निवडणूकीत मत प्रयोग करणा-यांना दिशा दिली पाहिजे. चळवळीत महिलांचा सहभाग नसणे ही आंदोलनाची शोकांतिकाच म्हणावी लागेल.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, माणसं पैशाने श्रीमंत होताना दिसत असली तरी वैचारिक दृष्टीने दरिद्री होत चालले आ-हेत. म्हणून परिवर्तनवादी आंदोलनाची वाताहात होत आहे. आपण वैचारीक तडजोड न करणारे जहाल आंबेडकरवादी होणे आवश्यक आहे. फुल्यांचे सत्यशोधक समाज आणि सार्वजनिक सत्यधर्माचे मर्म सम जून घेतले पाहिजे. तसेच राईटस



ऑफ मॅन लिहिणा-या थॉमस पेन यांच्या कडून फुल्यांनी घेतलेल्या प्रेरणेची जाणीव ठेवली पाहिजे. समाजातील महिला कुठल्या मालिका बघतात याचे विश्-लेषण करून ते अपत्यावर कसे संस्कार करतात? याची पुनम ांडणी करण्याची आवश्यकता आहे. करिता आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सदरील विधानाच्या ७३ व्या वर्धापनदिनानिमित्त चर्चा करीत आहोत. याप्रसंगी मी प्रथमतः सर्व वर्तमानपत्राचे अभिनंदन करतो ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्या प्रकाशित केल्या आ-हेत.

या कार्यशाळेचे. सुत्रसंचालन विलास रामटेके यांनी केले. सुरूवातीला मान्यवरांचे हस्ते आदर्शांना पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या. या कार्यशाळेत बामसेफच्या वरिष्ठ महिला कार्यकर्त्या मंदा वानखेडे यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यशाळेला इंजिनिअर किशोर पाटील, बी. बी. म ेश्राम, एड. विलास रामटेके, प्राचार्य विलास कट्यारे, प्रतीक पंचशील, साहेबराव इंगोले, सम्यक रामटेके, डॉ. व्ही. एच. कांबळे, सुभाष वानख-ेडे, भीमराज बोर्डे, अरुण इंगळे, प्रा. डॉ. सुकेशनी थोरात इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

## हॅण्डल लॉक केलेली दुचाकी पळवली

सोलापूर (प्रतिनिधी) हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.इडी.३३५८ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १७ नोव्हेंबर रोजी दुपारी सव्वा बारा ते पावणे दोन वाजण्याच्या सुमारास सोलापूर मंगळवेढा रोडवरील सांस्कृतिक मंगल कार्यालय येथे घडली. याप्रकरणी शेखर बिरू जाधव (वय-२२,रा.मु.पो.गुंजेगाव) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार उपास हे करीत आहेत.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर महाविद्यालयीन ज्युदो स्पर्धेत येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयाने घवघवीत यश मिळविले. ही स्पर्धा के. एन. भिसे महाविद्यालय कुर्डूवाडी येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेत विद्यापीठातील एकूण आठरा महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या सहा विद्यार्थी खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यापैकी चार विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. यामध्ये ७३ किलो वजनी गटात चंद्रिका बाबर बी.एस्सी भाग २ हिने प्रथम क्रमांक मिळविला. त्यामुळे तिची भोपाळ येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी वेस्ट झोन स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. तसेच जयदीप पवार ६० किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक, पवन रुपनर १०० किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक, दिव्यसाक्षी धोत्रे ५६ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्याचे रयत शिक्षण संस्थेच्या मध्य विभागीय सल्लागार समितीचे चेअरमन संजीव पाटील, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, महाविद्यालय विकास समि तीमधील सर्व सदस्य, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षचे समन्वयक डॉ. अमर कांबळे व स्वायत्त महाविद्यालय समन्वयक डॉ. मधुकर जडल यांनी विशेष अभिनंदन केले. या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा. विठ्ठल फुले, प्रा. मनोज खपाले व प्रा. अनिल परमार यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयीन क्षेत्रात सिनिअर विभागातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांनी विशेष कौतुक केले.



**स्वेरीत पाचवा 'मासिक योग दिन' साजरा**

**उपक्रमाला प्रथम वर्ष अभियांत्रिकी व वसतीगृहातील सर्व विद्यार्थ्यांचा प्रतिसाद**

# योगामुळे कार्यक्षमता वाढते : आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साध्वी तत्वमयी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'नियमित योग केल्याने आपले मन प्रसन्न राहते. हाती घेतलेल्या कार्यात सकारात्मकता निम ाण होते, उत्साह वाढतो व आपल्या कार्य करण्याच्या क्षमतेत कमालीची वाढ होते.' असे प्रतिपादन आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साध्वी तत्वमयी यांनी केले.

प्रत्येक वर्षी दि.२१ जून रोजी 'जागतिक योग दिन' हा आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्थात जगभरात साजरा केला जातो. दि.२१ जून रोजी स्वेरीत मुख्य 'जागतिक योग दिन' साजरा करण्यात आला. यावेळी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी यापुढेही 'स्वेरी अंतर्गत असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक महिन्याच्या दि.२१ तारखेला सामुहिक 'योग दिन' साजरा करण्याचे घोषित केले होते. तेंव्हापासून प्रत्येक म हिन्याच्या दि. २१ तारखेला न चुकता स्वेरीत 'योग दिन' घेतला जातो. गुरुवार, दि. २१ नोव्हेंबर २०२४ हा स्वेरीमध्ये 'पाचवा योग दिन' साजरा करण्यात आला. अभियांत्रिकीच्या दुसऱ्या, तिसऱ्या व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना पीएल (पेपर लिव्ह) निमित्त सुट्टी आहे तरीही यामध्ये खंड न पडता 'योगा' घेण्यात आला. या उपक्रमाला प्रथम वर्ष अभियांत्रिकी व वसतीगृहातील सर्व विद्यार्थ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला. डॉ.एन.पी. कुलकर्णी यांनी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साध्वी तत्वमयी यांचे स्वागत करून कार्यक्रम ाचे प्रास्तविक केले. प्रार्थनेने सुरवात करून साध्वी तत्वमयी यांनी विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक यांच्याकडून पुढे तासभर विविध प्राणायम करवून घेत-ले. सूर्यनमस्कार सह विविध आसने, भस्रीका प्राणायम तसेच श्वास, फुफ ुस्से, शरीराच्या विविध अवयवांच्या हालचालीसाठी योगाचे विविध प्रकार करून घेतले. या योग सरावानंतर सर्वांच्या चेहऱ्यावर अधिक उत्साह दिसून येत होता. मार्गदर्शन करताना अनुयायी साध्वी तत्वमयी पुढे म्हणाल्या की, 'योग हा शरीर, स्वास्थ्य आणि मनाच्या एकाग्रतेबरोबर शरीराच्या प्रत्येक अवयवाचा व्यायाम करुन घेतो. त्यामुळे मन, शरीर आणि आत्मा संतुलित राहण्यासाठी नियमित योगाची गरज आहे तसेच ध्यान केल्यामुळे मनाची एकाग्रता वाढते. नियमितच्या कामामुळे नकळत ताण- तणावाम ुळे मनाची अवस्था बदलते. म्हणून मानसिक शांतीसाठी नियमित योगा करणे आवश्यक आहे.' असे सांगून 'योगा' चे फायदे सांगितले. सदरचा कार्यक्रम स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य



**स्वेरीमध्ये 'पाचव्या योग दिन' निमित्त विद्यार्थी व प्राध्यापकांना मार्गदर्शन करताना आर्ट ऑफ लिव्हिंगच्या अनुयायी साध्वी तत्वमयी समोर स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, तसेच सूर्यनमस्कार करताना अनुयायी साध्वी तत्वमयी, विद्यार्थी, विद्यार्थिनी व प्राध्यापक वर्ग.**

प्रा.सतीश मांडवे, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.महेश मठपती, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्या-र्थी, विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीत पार पडला. प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# जिल्ह्यातील सर्व मतमोजणी केंद्र परिसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १६३ लागू

## जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : मा. भारत निवडणूक आयोगाने दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी अन्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४ चा कार्यक्रम घोषित केला असून कार्यक्रम घोषित झाल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आली आहे. त्याअनुषंगाने विधानसभा दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे. सदरची निवडणूक प्रक्रिया विनाअडथळा व भयमुक्त वातावरणात पार पाडली जाणे आवश्यक आहे.

सोलापूर जिल्हयातील विधानसभा मतदार संघासाठीच्या मतमोजणी कामी दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणीच्या ठिकाणी येणा-या उमेदवारांचे सोबत त्यांचे समर्थक, वाहने, कार्यकर्ते हे मोठ्या संख्येने उपस्थित असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या करीता सार्वत्रिक विधानसभा निवडणुक २०२४ निवडणूकीसाठीच्या मतमोजणीसाठी दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी खालील विधानसभा मतदारसंघासाठीच्या मतमोजणी ठिकाणच्या परीसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे करीता खालील नमुद केलेली कृत्ये करणेस प्रतिबंध करण्यात येत आहे.

२४४ -करमाळा विधानसभा मतदारसंघ- मतमोजणी केंद्राचे ठिकाण -शासकीय धान्य गोदाम, करमाळा

२४५-माढा- विधानसभा मतदारसंघ -मतमोजणी केंद्राचे ठिकाण - महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ गोदाम, अकुलगांव, कुडूवाडी

२४६ -बाशी विधानसभा मतदारसंघ -मतमोजणीचे ठिकाण- शासकीय धान्य गोदाम, उपळाई रोड, बार्शी

२४७-मोहोळ (अजा) विधानसभा मतदारसंघ -मतमोजणीचे ठिकाण - शासकीय धान्य गोदाम, पुणे सोलापूर रोड, इइछ्ङ जवळ मोहोळ

२४८-सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघ-मतमोजणीचे ठिकाण -सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगांव, सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग सोलापूर

२४९-सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ-मतमोजणी केंद्राचे ठिकाण- नुतन मराठी विद्यालय, १५६-बी रेल्वे लाईन, डफरीन चौक सोलापूर


२५०-अक्कलकोट विधानसभा मतदारसंघ -मतमोजणी केंद्राचे ठिकाण -नवीन तहसिल कार्यालय अक्कलकोट

२५१-सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघ-मतमोजणी केंद्राचे ठिकाण -राज्य राखीव बल गट क्रं-१०, विजापूर रोड सोरेगांव सोलापूर

२५२ -पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघ - मतमोजणी केंद्राचे ठिकाण -शासकीय धान्य गोदाम, कराड रोड, पंढरपूर

२५३-सांगोला विधानसभा मतदारसंघ -मतमोजणी केंद्राचे ठिकाण - पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मुती भवन (ढुप क्रश्रश्र) सांगोला

२५४ -माळशिरस (अजा) विधानसभा मतदारसंघ -मतमोजणी केंद्राचे ठिकाण -महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ गोदाम, अकलुज



जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, सोलापूर कुमार आशीर्वाद, यांच्याआदेशान्वये भारतीय नागरीक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ खाली प्रतिबंध अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन असा आदेश देतो की, सोलापूर जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघनिहाय मतमोजणी ठिकाणच्या परीसरात दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजी पहाटे-०५.०० वाजलेपासून ते मतमोजणीची संपूर्ण प्रक्रिया संपेपर्यंत खालील कृती करण्यास मनाई करीत आहे.

मतमोजणी दिवशी मतमोजणी ठिकाणापासून २०० मीटर परिघाच्या परीसरात मतमोजणी कर्मचारी/पुरवठादार, उमेदवार व त्यांचे नियुक्त केलेल्या प्रतिनिधी व्यतिरीक्त कोणाही व्यक्तिला प्रवेश करणेस मनाई आहे. मतमोजणी कालावधीत अथवा मतमोजणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या लाऊड स्पिकरचा वापर सक्षम पोलीस अधिकाऱ्यांच्या लेखी पूर्वपरवानगी शिवाय रस्त्यावर, व्यासपिठावर किंवा फिरत्या वाहनावर बसविणेस मनाई आहे. आदर्श आचारसंहितेचा भंग होईल अशा प्रकारचे भाषण करणे, नक्कल करणे, चित्रे/चिन्हे रेखाटणे अगर त्यांचे प्रदर्शन करणे अथवा तत्सम कृती करणेस मनाई आहे.

मतमोजणीठिकाणापासून २०० मीटर परिघाच्या परिसरामध्ये मोटरगाड्या, वाहनांचा वापर करणे अथवा थांबविणेस मनाई आहे. व खाजगी वाहने ही निश्चित केलेल्या वाहन तळावरच लावण्यात यावीत. (निवडणूकीच्या अनुषंगाने वापरात असलेली शासकिय वाहने वगळून.) मतमोजणी ठिकाणाच्या २०० मीटर परिघाच्या परिसरामध्ये कोणत्याही व्यक्तिने मोबाईल फोन, कॉर्डलेस फोन,वायरलेस सेट किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक सहित्य बाळगणे, वापरणेस मनाई आहे. (भारत निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेले अधिकारी व मतमोजणीसाठीच्या कामाशी निगडित कर्मचारी वगळून.) मतमोजणी ठिकाणी उमेदवार, मतमोजणी प्रतिनिधी वा इतर प्रतिनिधी यांनी मोबाईल वापरणे किंवा फोटो काढणे अथवा चित्रीकरण करणे तसेच गोपनियतेचा भंग होईल अशी कृती करणेस मनाई आहे.

मतमोजणी ठिकाणापासून २०० मीटर परिघाच्या परिसरामध्ये कोणत्याही व्यक्तिने (शस्त्र अधिनियम १९५९ व नियम २०१६ मधील तरतुदी प्रमाणे) कोणत्याही प्रकारची शस्त्रे, अग्नी शस्त्रे व दारुगोळा इ. चा वाहतूक, जवळ बाळगणे अथवा वापर करणेस मनाई आहे. (सुरक्षेच्या कारणास्तव नेमले पोलीस अधिकारी/कर्मचारी वगळून.)

इंस्ट्राग्राम, व्हॉटस्अॅप, ट्विटर, फेसबुक, इत्यादी समाज माध्यमाद्वारे जातीय तणाव निर्माण करणा-या गोष्टी पसरवण्यास मनाई करण्यात येत आहे.

मतमोजणी ठिकाणाच्या २०० मीटर परिघाच्या परिसरामध्ये कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण, वाद्य वाजवणे, गाणी वाजविणे, गाणी म्हणणे, गुलाल उधळणेस, वाहनांच्या सायलेन्सरच्या पुंगळ्या काढुन मोठ्याने आवाज करण्यास, गलाल, रंग उधळणे अशा प्रकारचे गैरशिस्त वर्तन करण्यास मनाई करणेत येत आहे.

कोणत्याही प्रकारे जातीय तणाव निर्माण करणा-या मजकूराचे फ्लेक्स, बोर्डस व आक्षेपार्ह घोषणा देण्यास मनाई करणे येत आहे.

सदर आदेशाचा कोणत्याही प्रकारे भंग केल्यास, ती व्यक्ती भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ प्रमाणे तसेच मतमोजणीसाठीच्या गोपनियतेचा भंग झालेस लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ मधील तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील. हा आदेश भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (१) अन्वये तातडीचे प्रसंगी एकतर्फी देण्यात येत आहे. असे आदेश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

---

## सांगली येथील कडेगावमध्ये विषारी वायुगळती; तिघांचा मृत्यू, दहा जण रुग्णालयात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगली/प्रतिनिधी : कडेगाव तालुक्यातील शाळगाव-बोंबाळेवाडी औद्योगिक वसाहतीतील एका रसायन कारखान्यात विषारी वायूची गळती झाल्याने दोन महिलांसह तिघांचा मृत्यू झाला. या गळतीमुळे याशिवाय अन्य दहा जण बाधित झाले असून यातील तीन रुग्ण अत्यवस्थ आहेत. या गळतीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. सुरुवातीस खबरदारीचा उपाय म्हणून या परिसरातील नागरिकांना अन्यत्र हलवण्यात आले. नंतर परिणाम ओसरल्यावर घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमा झाली. औद्योगिक वसाहतीमध्ये म्यानमार रसायन कारखाना असून, या ठिकाणी गुरुवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास विषारी वायूची गळती झाली. त्यामध्ये राणी राजेंद्र उथळे (वय ४०, रा. येतगाव) या महिलेचे उपचार सुरू असताना रात्री, तर नीलम रेठरेकर (वय ४५, रा. वांगरेठरे मसूर) आणि किशोर चापकर (वय ४५, रा. बोंबाळेवाडी) या दोघांचा उपचार सुरू असताना शुक्रवारी मृत्यू झाला.

विषारी वायूची बाधा झालेल्या माधुरी पुजारी (वय ४०), सायली पुजारी (वय २२), मारुती थोरात (सर्वजण रा. बोंबाळेवाडी), प्राजक्ता पोपट मुळीक, वरद पोपट मुळीक, शिवानी राहुल मुळीक, शुभम अर्जुन यादव (सर्व रा. शाळगाव) यांच्यावर कराडमधील सह्याद्री, श्री हॉस्पिटलसह अन्य खासगी रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. तर रायगाव, शाळगाव व बोंबाळवाडी या परिसरातील १० जणांवरही स्थानिक रुग्णालयात उपचार करण्यात आले.



विषारी वायुगळतीने परिसरातील डोंबा वस्ती, बारूखोल परिसरासह शाळगाव, बोंबाळेवाडी, रायगाव परिसरात भीतीचे वातावरण पसरले. सुरुवातीस खबरदारीचा उपाय म्हणून या परिसरातील नागरिकांना अन्यत्र हलवण्यात आले. नंतर परिणाम ओसरल्यावर घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमा झाली.

घटना घडल्यानंतर माजी आमदार पृथ्वीराज देशमुख, आमदार डॉ. विश्वजित कदम यांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच तहसीलदार अजित शेलार, पोलीस निरीक्षक संग्राम शेवाळे यांच्यासह प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारीही घटनास्थळी पोहचले. अग्निशामक यंत्रणा, वैद्यकीय पथकही परिसरात ठाण मांडून आहे. वायुगळतीच्या सखोल चौकशीची मागणी करण्यात येत असून, या परिसरात रहिवासी मुखपट्टीचा वापर करून दैनंदिन काम करत आहेत.

---

## प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर दुचाकी मालिका सुरू- आकर्षक क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर या कार्यालयात लवकरच दुचाकी मालिका सुरू करण्यात येत आहे. वाहनांची नवीन मालिका चालू होण्याच्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये मोठया प्रमाणावर इच्छुकांची गर्दी होते व त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेवर त्याचा ताण पडतो व बऱ्याच वेळा नागरिकांनाही याचा त्रास होतो. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना सुलभतेने तो मिळावा, यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरुन हवे असतील त्यांनी दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी सोबतच्या वेळापत्रकानुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या दरम्यान विहीत नमुन्यातील अर्जांमध्ये कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात डीडी (केवळ क्र १६ अन्वये जारी झालेले डीडी), पत्याचा पुरावा, आधार लिंक मोबाईल नंबर, आ-ेळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह स्वत: जमा करावा.

हा डीडी फक्त Dy R.T.O. Solapur यांच्या नावे नॅशनलाईल/शेडयुल्ड बँकेचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील.

अर्जासोबत केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ४ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ५ अ मध्ये विहीत केलेल्या पत्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक असेल (उदा. आधार कार्ड, टेलिफोन बील इ.)

एकाच नंबरकरिता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ०५.०० वाजता कार्यालयीन नोटीसबोर्डवर लावण्यात येईल. या यादीतील अर्जदारांना लिलावाकरिता जर जास्त रक्कमेचा डीडी जमा करावयाचा असेल त्यांनी सोबतच्या वेळापत्रकानुसार दर्शविलेल्या दिवशी (दि. २७ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत) सीलबंद लिफाफ्यात कार्यालयात जमा करावा. लिलावासाठी सदर केलेला डीडी रूपये ३००/- पेक्षा कमी रक्कमेचा नसावा. सदर डीडी फक्त Dy R.T.O. Solapur यांच्या नावे नॅशनलाईज/शेडयुल्ड बँकेचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील डीडी कमीत कमी एक महिना मुदतीमध्ये असावा. दिनांक २७ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी ०४.०० वाजता सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, सोलापूर यांच्या उपस्थितीत पात्र व्यक्तीसमोर (संबंधित अर्जदार) लिफाफे उघडुन ज्या अर्जदाराने विनिर्दिष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रकमेचा डीडी सादर केला असेल त्यास नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाईल.

एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखून ठेवलेल्या दिनांकापासून १८० दिवसांच्या आत नोंदणीसाठी वाहन सादर करून वाहन क्रमांक प्राप्त करून घ्यावा अन्यथा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक आपोआप रद्द होईल व फी सरकारजमा होईल, कोणताही विशिष्ट नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेली फी, कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही. वाहन धारकाने एका वाहनासाठी एकापेक्षा जास्त आकर्षक नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी कार्यालयात डी. डी. जमा केल्यास सदर बाबीस कार्यालय जबाबदार राहणार नाही.

दुचाकी वाहनांच्या मालिकेचे वेळापत्रक (चक १३ एठ)

दि. २६ नोव्हेंबर २०२४ तिप्पट शुल्कचे अर्ज व परिवहन संवर्ग वाहनांसाठी नियमित अर्ज स्विकारणे. वेळ -११ ते ४

दि. २६ नोव्हेंबर २०२४ सायंकाळी ०५.०० वाजता यादी जाहीर.

दि. २७ नोव्हेंबर २०२४ दुपारी ०२ वाजेपर्यंत बंद लिफाफ्यात लिलावासाठीचे डीडी स्विकारणे रूपये ३००/- पेक्षा जास्त रकमेचे डीडी जमा करणे गरजेचे.

दि. २७ नोव्हेंबर २०२४ तिप्पट शुल्काच्या आलेल्या अर्जासाठी व परिवहन संवर्ग वाहनांसाठी आलेल्या डबल अर्जांचा लिलाव दुपारी ०४.०० वाजता.

अशी माहिती सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी सोलापूर यांनी दिली आहे.

---

**शिवसेना विरुद्ध शिवसेना असा सामना रंगणार**

**मुंबईत १९ जागांवर ठाकरे व शिंदेंचे उमेदवार आमनेसामने**

## ‘हे’ ५१ मतदारसंघ ठरवणार खरी शिवसेना कोणाची, ठाकरे-शिंदेंची प्रतिष्ठा पणाला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी (२० नोव्हेंबर) मतदान पार पडलं. यावेळी निवडणुकीच्या रिंगणात अनेक पक्ष व हजारो उमेदवार आहेत. उद्या (शनिवार, २३ नोव्हेंबर) या निवडणुकीचा निकाल जाहीर होईल. दरम्यान, खरी शिवसेना कोणाची? खरी राष्ट्रवादी कोणाची? या प्रश्नांची उत्तरं देखील मिळतील. एकनाथ शिंदेंबरोबर जास्त आमदार असल्याने निवडणूक आयोगाने त्यांच्या गटाला खरी शिवसेना म्हणून मान्यता दिली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या गटाला नवं नाव आणि नवं निवडणूक चिन्ह घेऊन ही निवडणूक लढवावी लागली. मात्र, आता निवडणुकीत मतदार कोणत्या शिवसेनेची निवड करणार? जनतेच्या न्यायालयात खरी शिवसेना म्हणून कोणाला मान्यता मिळणार? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. शिवसेनेचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या मुंबई महानगर प्रदेशात १९ जागांवर आणि एकट्या मुंबईत १२ मतदारसंघात ठाकरेंची शिवसेना



विरुद्ध शिंदेंची शिवसेना असा थेट सामना होणार आहे. मराठवाडा आणि कोकणात आठ, विदर्भात सहा, उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्रात प्रत्येकी चार जागांवर शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत होईल. मतदारांच्या नजरेतील बाळासाहेबांचा खरा वारसदार कोण? याचा निकाल या माध्यमातून लागणार आहे.

यंदाची विधानसभा निवडणूक ही उद्धव ठाकरे आणि त्यांच्या गटासाठी लिटमस टेस्टसारखी आहे. आपल्या वडिलांचा खरा वारसदार कोण? हे सिद्ध करण्याची संधी त्यांच्याकडे चालून आली आहे.

तसेच अधिकच्या जागा जिंकून महाविकास आघाडीत मुख्यमंत्रिपदाचा दावा करण्यासाठीही ही निवडणूक त्यांच्यासाठी महत्त्वाची मानली जात आहे. दुसऱ्या बाजूला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोरही शिवसेना पक्षाचे जास्तीत जास्त आमदार निवडून आणण्याचं आव्हान आहे. त्यांच्याबरोबर गेलेल्या ४० आमदारांची आमदारकी टिकवणं आणि काही नवे आमदार निवडून आणणं त्यांच्यासमोरचं मोठं आव्हान आहे. ५० हून अधिक आमदार निवडून आले तर कदाचित त्यांना पुन्हा एकदा मुख्यमंत्रिपदही मिळण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे.

राज्यातील एकूण ४९ मतदारसंघांमध्ये शिवसेना (ठाकरे) विरुद्ध शिवसेना (शिंदे) पक्षाचे उमेदवार आमने सामने उभे ठाकले आहेत. या ४९ मतदारसंघांवर संपूर्ण राज्याचं लक्ष लागलेलं असेल. या ४९ पैकी जास्त जागा जो पक्ष जिंकेल तो पक्ष बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांवर चालणारा पक्ष आमचाच आहे, आम्हीच मूळ शिवसेना आहोत असा दावा करू शकेल.

---

## थोडक्यात...




### पतीची बदनामी करत जातीवाचक शिवीगाळ ; दोघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) पतीची बदनामी करून जातीवाचक शिवीगाळ करत दमदाटी करून मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हि घटना २० ते २१ नोव्हेंबर दरम्यान होटगी रोड येथील यल्लमा देवी मंदिर शंकर नगर शिवशाही समोर घडली.याप्रकरणी अंजली संतोष कांबळे (वय-२५,रा.शंकर नगर,होटगी रोड,शिवशाही समोर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून लक्ष्मीबाई दिंडोरे व शिवशंकर उर्फ बाबुशा कामशेट्टी (रा.शंकर नगर,होटगी रोड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी व फिर्यादी यांच्या पतीची बदनामी करून जातीवाचक शिवीगाळ करत दमदाटी केली.त्यानंतर फिर्यादी यांच्या अंगावर येऊन मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस आयुक्त पोमण हे करीत आहेत.

### जमाबंदीच्या आदेशाचे उल्लंघन ; सहा जणांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) बेकायदेशीरपणे एकत्रित येऊन गैर कायद्याची मंडळी जमवून जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून शरद कोळी यांचा प्रतिकात्मक पुतळा गाढवावर बसवून त्यास मारून शरद कोळीचे करायचे काय खाली मुंडी वर पाय अशी घोषणाबाजी केल्याची फिर्याद पोलीस कॉन्स्टेबल आसिफ मौला शेख (नेमणूक जेलरोड पोलीस ठाणे) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून शोएब महागामी व त्याच्या सोबत असलेले इतर चार ते पाच कार्यकर्ते यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

ही घटना २१ नोव्हेंबर रोजी दुपारी पावणे चार वाजण्याच्या दरम्यान संपर्क कार्यालय समोरील सोशल कॉलेज जवळ मुस्लिम पाच्छा पेठ येथे घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार खान हे करीत आहेत.

### संदीप गायकवाड आणि श्रीनिवास नंदाल दोघांना दोन वर्षासाठी तडीपार

सोलापूर : शहरात सन २०१२, २०१५, २०१६, २०१७ आणि २०२३ या कालावधीमध्ये गैरकायद्याची मंडळी जमा करून दंगा करणे,नागरिकांना शिवीगाळ,दमदाटी,मारहाण करून दुखापत करणे,जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे,चोरी करणे यासारखे गुन्हे विजापूर नाका पोलीस ठाण्यात दाखल असलेला संदीप मावला गायकवाड (वय २३ राहणार सेटलमेंट फ्री कॉलनी क्रमांक सहा,श्रीकृष्ण मंदिर जवळ) याला सोलापूर जिल्हा सोलापूर आणि धाराशिव जिल्हा इथून दोन वर्षासाठी तडीपार केली आहे.त्यास तडीपार केल्यानंतर कर्नाटक येथे सोडण्यात आले आहे.

तर शहरातील सलगर वस्ती पोलीस ठाणे येथे सन २०१३-१४ आणि २०२४ या कालावधीमध्ये घरपोडी करणे,चोरी करणे यासारखे गुन्हे दाखल असलेल्या श्रीनिवास नरेश नंदाल याला सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्यात आले आहे.त्याला तडीपार केल्यानंतर पुणे येथे सोडण्यात आले आहे.